ॐ

॥ श्री दत्त प्रसन्न ॥

# श्रीकृष्ण सरस्वती दत्त महाराज

यांच्या

## समाधीस्थानी

नित्यनैमित्तिक म्हटला जाणारा



# दैनंदिन आरती संग्रह

**पहाटे ५.३० च्या सुमारास श्रींना जागे करून सकाळी ६.०० वा. श्रींचे पादुकांवर पंचामृत अभिषेक व पूजा होऊन सूर्योदयाच्यावेळी काकड आरती सुरु होते. काकड आरती नंतर परंपरेनुसार श्रींना दहीभात व खिचडीचा नैवेद्य दाखविला जातो.**

## ॥ काकड आरती ॥ (वेळ: सूर्योदय समयी)

उठि उठि बा दत्तात्रेया । भानू करू पाहे उदया ॥ करुनी दिनावरती दया । चरण दावा वेगेसी ॥ धृ. ॥ मंद वायु हा सुटला । पक्षी करिताति किलबिल । दीप वर्ण शुभ्र झाला । पूर्व दिशा उजळली ॥ उ. ॥ ॥१॥ करुनी कृष्णेचे सुस्नान । घेऊनी पुजेचे सामान । सकळां लागलेसे ध्यान । कवाड केंव्हां उघडेल ॥२॥ आले देवादिक दर्शना । त्यांच्या पुरवाव्या वासना ॥ संतोषोनी आपुल्या मना । तिर्थप्रसाद अर्पावा ॥३॥ गुरु त्रैमूर्ती तू साचार । करिसी भक्तांचा उध्दार ॥ म्हणुनी धरिला हा अवतार ॥ भक्त रक्षिसी संकटी ॥४॥ म्हणुनि राम लागे पायी । मागे हीच इच्छा देई ॥ तूंचि बाप तूंचि आई । प्रतिपाळावे बाळका ॥५॥

उठा उठा वेगेसी । चला जाऊं राउळासी । जळतील पातकांच्या राशि ॥ काकड आरती देखिता ॥१॥ उठा उठा साधुसंत । साधा आपुले स्वहित ॥ गेला गेला हा नरदेह । मग कैचा भगवंत ॥धृ॥ ॥२॥ उठोनिया पहाटे । विटेवरी पहा उभा नीट । चरण जयाचे गोमटे । अमृत दृष्टी अवलोकां ॥३॥ जागे करा रुक्मिणी वरा । देव आहे निजसुरा ॥ वेगे लिंबलोण करा । दृष्ट होईल तयासी ॥४॥ पुढे वाजंत्री वाजती । ढोल दमामे गर्जती ॥ होतसे काकड आरती । पांडुरंग रायाची ॥५॥ सिंहनाद शंखभेरी । होतो गजर महाद्वारी ॥ केशवराज विटेवरी । नामा चरण वंदितो ॥६॥

भक्तिचिया पोटी । बोध काकडा ज्योती ॥ पंचप्राण जीवेभावे ओवाळूं आरती ॥ ओवाळूं आरती माझ्या पंढरीनाथा ॥ माझ्या सद्गुरू नाथा । दोन्ही कर जोडूनी । चरणी ठेविला माथा ॥धृ.॥ काय महिमा वर्णू देवा, सांगणे ते किती । कोटी ब्रह्म हत्या मुख पाहता जाती ॥१॥ राई रखुमाबाई दोही दो बाजू उभ्या । मयूर पिच्छ चामरे ढाळिती ठाईच्या ठाई । ओवाळूं ॥२॥ तुका म्हणे लावण्यदीप । उन्मनीची शोभा ॥ विटेवरी उभा ॥ जैसा लावण्यगाभा ॥३॥

पंचप्राण काकडे आरती तत्वात्मक ज्योति । ओवाळीला गुरु त्रयमूर्ति परमात्मा प्रीती ॥धृ.॥ ओवाळूं आरती माझ्या सद्गुरू नाथा । शरण मी आलो तुज । श्रीपदी ठेविला माथा ॥१॥ कृष्णा सुपंचगंगा अनादि संगमी । राहे गुरुवर तरू तळी ॥ तो हा माझा कुलस्वामी ॥ ओवाळू ॥२॥ द्वारी चौघडा वाजे वाजंत्री वाजती नाना घोष गर्जती । भक्त स्वानंदे स्तविती ॥ ओवाळूं ॥३॥

इंद्रादिक सुरवर पन्नग दर्शनास येती । नारद मुनिवर किन्नर तुंबर सुस्वरे आळविती ॥ ओवाळूं ॥४॥ पाहुनी सिंहासनी आदिमुर्ती सावळी । श्रीगुरू भक्त तन्मय । श्रीपदी ओवाळी ॥ ओवाळूं ॥ ५॥

## ॥ भजन ॥

हरिनारायण, गुरुनारायण, दुरितनिवारण, परमानंद, परात्पर शंकर, भक्तजनप्रिय, पंकजलोचन, नारायण तव दासोहं ॥

## ॥ अष्टक १ ॥

अवधूत निराकारी जयाची तिन्ही लोकी फेरी ॥धृ. ॥ ब्रह्मा विष्णू पूर्ण महेश्वर चैतन्याचा गोळा । अवतरलासे दत्तदिगंबर त्रिभुवनी ज्याची लिला ॥१॥ प्रयाग तीर्थी स्नान जयाचे करवीर क्षेत्री भिक्षा ॥ नित्य निरंजन निर्गुण रंगी प्रणव रुपिणी दीक्षा ॥२॥ शंखचक्र आणि त्रिशूल विराजे भस्मोध्दलित काया । चतुर्वेद विधी अंश लागतीं सदा यतींच्या पाया ॥३॥ तेहतीस कोटी सुरगण मुनिजन जोडिती ज्याला पाणी । कळि काळाचा कहर चढेना । सदा फकीर निर्वाणी ॥४॥ नामप्रतापे जळतील पापे । भवभय सर्वाठायी ॥ भाव भक्तीचा बहुं भुकेला भले जना प्रतिपाळी ॥५॥ श्रीगुरू महिमा शंकर उमा आनंदाने गाती । सीताराम ऐसा प्रेमा राहो निरंतर चित्ती ॥६॥

## ॥ अष्टक २ ॥

त्रिभुवन पूर्ण प्रकाशा सर्वेश्वर जगदीशा । दत्तात्रेय दत्तात्रेय जय त्रैलोक्य पते ॥धृ.॥ परमात्मा परमज्योति । सद्‌गुरू श्रीत्रैमूर्ती ॥१॥ निर्गुण निर्विकार पूर्णानंद अवतारा ॥२॥ मुनिजन मानसचंद्रा । गुरुवर धैर्य समुद्रा ॥३॥ अवतार श्रीवल्लभ, नरहरी त्रिभुवनी दुर्लभ ॥४॥ करुणानिधी गुण कमलाक्षा त्रिगुणात्मक यति दक्षा ॥५॥ काशायांबर वसना सुभस्मरुद्राक्षाभरणा ॥६॥ दंड कमंडलू करधर षडविध आयुध परीकर ॥७॥ किरीट कुंडल मंडित षडभुज विराजित ॥८॥ कृष्णासंगम तरुवर ॥ श्रीमत्स्वात्मक गुरूवर ॥९॥ दुष्कृतकृत्य गुरुभक्त पदी तव कृतमुक्त ॥१०॥

## ॥ अभंग ॥

तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत ॥
काखे झोळी पुढे श्वान । नित्य जान्हवीचे स्नान ॥
माथा शोभे जटाभार । अंगी विभूती सुंदर ॥
शंख चक्र गदा हाती । पायी खडावा शोभती / गर्जती ॥
तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥
दिगंबरा दिगंबरा ॥ श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥

**दुपारी १२.१५ वा. महानैवेद्य व विडा समाधीस दाखवून १२.३० वा. दोन प्रहरची आरती सुरु होते. आरती नंतर श्रींना शेजघरात शेज घालून झोपविले जाते व दुपारी १.०० ते ४.१५ पर्यंत समाधीचे दर्शन बंद राहते.**

## ॥ दोनप्रहरची आरती ॥ (वेळ: दु. १२.३० वाजता)

तो परमहंस आम्ही आज देखिला माये । आरती करुनी भावे शिर वंदियले पाये ॥ तो परमहंस आम्ही ॥धृ॥ वासना वसन फाडी । द्वैत जानवे तोडी । मुंडोनी कर्म केशा । भेद नि:शेष सांडी । तो परमहंस ॥१॥ करुनी वृत्ती रक्षा गीळ सर्व अपेक्षा । मंत्रना यंत्र नेणे शुध्द अवधूत दीक्षा ॥तो.॥२॥ सर्वदा सर्व साक्ष । नेणे बंधना मोक्ष । प्रणवातीत आत्मा । केशव स्वामी प्रत्यक्ष ॥ तो.॥३॥

आरती सद्गुरूची । सुखे कल्पतरूची ॥ सत्चिदानंद नामे । गाता अतर्क्य रुची ॥ आरती सद्गुरूची ॥धृ.॥ देह हा सातवीती । तो मी ऐसी प्रचीती । असोनी विश्वकर्ता ॥ दावी करुणा मूर्ती ॥आ.॥१॥ देहात्म बुध्दी खोटी । नासोनिया कोटी कोटी । ब्रह्मांड रचना ही ॥ दावि माझिये पोटी ॥आ.॥२॥ संन्यासरूप देवे धरीयले वासुदेवे ॥ गुरूत्व उध्दरिले । जय देवादिदेवे ॥आ.॥३॥ ज्या मने आठवितो । मन तेच तोही होतो ॥ मी करू काय आता । माझे मीपण ही तो ॥आ.॥४॥ वामने बुध्दी देही । देहा येवढी तीही । स्वानंद सिंधु केली । जेथे द्वैत नुरे काही ॥५॥

नाना नाटक लीला सुंदर रूप साजे ॥ नाना तीर्थी क्षेत्री अभिनव गति गाजे । अगाध महिमा पिंड ब्रह्मांडी गाजे ॥ जयदेव जयदेव आत्मारामा । निगमागम शोधीता नकळे गुणसीमा जयदेव जयदेव ॥धृ.॥ बहुरूपी बहुगुणी बहुतां काळाचा । हरिहर ब्रह्मादिक देव सकळांचा ॥ युगानयुगी आत्माराम आमुचा । दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥धृ.॥

युगे अठ्ठावीस विटेवरी उभा । वामांगी रखुमाई दिसे दिव्य शोभा ॥ पुंडलिकाचे भेटी परब्रह्म आले गा । चरणी वाहे भीमा उध्दरी जगा ॥ जयदेव जयदेव जय पांडुरंगा । रखुमाई वल्लभा राईच्या वल्लभा पावे जिवलगा ॥ धृ. ॥ तुळसीमाळा गळा कर ठेऊनी कटी । कासे पितांबर कस्तुरी लल्लाटी ॥ देव सुरवर नित्य येती भेटी । गरुड हनुमंत पुढे उभे राहती ॥ १ ॥ जय. ॥ आषाढी कार्तिकी भक्तजन येती । चंद्रभागेमध्ये स्नान जे करिती ॥ दर्शन हेळामात्रे तया होय मुक्ति । केशवासी नामदेव भावे ओवाळिती ॥ जय. ॥

## ॥ भजन ॥

हरिनारायण, गुरुनारायण, दुरितनिवारण, परमानंद, परात्पर शंकर, भक्तजनप्रिय, पंकजलोचन, नारायण तव दासोहं ॥

## ॥ मंत्रपुष्पांजली ॥

ॐ यज्ञेन यज्ञमयजंत देवास्तानि धर्माणि प्रथमान्यासन् | ते हं नाकं महिमान: सचंत यत्र पूर्वे साध्या: संति देवा: ॐ राजाधिराजाय प्रसह्ये साहिने | नमो वयं वैश्रवणाय कुर्महे स मे कामान्कामकामाय मह्यम् | कामेश्वरो वैश्रवणो ददातु | कुबेराय वैश्रवणाय | महाराजाय नम: ॐ स्वस्ति साम्राज्यं भौज्यं स्वाराज्यं वैराज्यं पारमेष्ठ्यं राज्यं महाराज्यमाधिपत्यमयं समंतपर्यायी स्यात्सार्वभौम: सार्वायुष आंतादापरार्धात्पृथिव्यै समुद्रपर्यंता या एकराळिति तदप्येष श्लोकोऽभिगीतो मरुत: परिवेष्टारो मरुत्तस्यावसन्गृहे आविक्षितस्य कामप्रेर्विश्वेदेवा: सभासद इति.

**सूर्यास्त होण्यापूर्वी १५ ते २० मि. श्री ज्योतिर्लिंग अष्टक सुरु होते व सूर्यास्त समयी सायंकाळची आरती सुरु होते.**

तो हा कृष्णसरस्वती गुरु यती
कोल्हापूरी राहिला ॥ भक्तांसी सांभाळीला
तो हा कृष्णसरस्वती गुरु यती
कोल्हापूरी राहिला ॥
॥ श्रीगुरुदेव दत्त ॥

## ॥ श्री जोतिर्लिंग अष्टक ॥

पायी तुझ्या मस्तक हे असावे । नयनी सदा रूप तुझे वसावे ।
तुझे चरित्र श्रवणी श्रवणासी द्यावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥१॥
वाणीस हे अतुलनाम तुझे घडो दे । ध्यानी तुझ्या मन सैदेव बरे जडो दे ।
पाणीस पूजन तुझे विधी युक्त द्यावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥२॥
हे चित्त निश्चळ तुझे भजनी वळावे । दुर्गुण दु:संगती ना वळावे ।
क्रोधादी काम रिपु हे समुळी गळावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥३॥
पायी अमंगळ पथापंथी न क्रमावे । यात्रा शिवालय कथा पथ आक्रमावे ।
अज्ञान मोह कुमती सखया हरावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥४॥
वाचे सहित मन देह वळोनी मागे । भक्तीस लावी आपुल्या दृढ हेची मागे ।
बाह्यांतरी अचल रूप तुझे भरावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥५॥
ब्रह्मस्व मुक्त करणे तुज भार पायी । घालू नको मज दिना भलत्या अपायी ।
आहे पतित सखया दिन उद्धरावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥६॥
पारमार्थ साधूनी प्रपंच बरा असावा । दारिद्र्य दु:ख भय क्लेश कदा नसावा ।
स्त्री पुत्र युक्त कमला सुख हे असावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥७॥
पायी ब्रिदावळी विराजित पावना की । धावे भक्तांचे संकट हरावयासी ।
राखे ब्रिदास भवसंकट हे हरावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥८॥
श्रीनाथजी शिवजद्गुरू ज्योतिर्लिंगा । दे जन्म ज्यासी तव भक्ती तया कुलींगा ।
गोविंद नंदन सुतांतर की न द्यावे । श्रीनाथजी मजप्रती वरदान द्यावे ॥९॥

# ॥ श्री दत्तात्रेय अष्टक ॥

कृष्णा तटी अति पुनित शिरोळ पेटा । तो नांदणी म्हणुनी गावही धन्य मोठा ।
जोशी कुळात कुलदीप सौख्य राशी । श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥१ ॥
यत्कीर्ती दिव्य पसरे दिगंत थोर । गंभीर जो शांत सैदेव बहू उदार ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी । श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥२॥
अप्पाख्य धर्म रत ऋद्विज यत पिताकी । ती अन्नपूर्णा करी जननी त्रिलोकी ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥३॥
कोणा सवेही न वदे निज वैखरीने ॥ शिष्या अनुग्रह करी प्रभू तो परेने ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥४॥
क्रीडामिषे अमित अदभूत बाललीला । दावितसे अनुदिनी सकला जनाला ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥५॥
सुश्रृषणा करीत धेनूची जो सदैव । लौकिक संग मुळी टाळीत सर्वथैव ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥६॥
अंधासी दृष्टी दिधली मुक्यासी वाचा । दुष्कर्म सर्व हरिला कुटीला जनांचा ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥७॥
स्वानंद हास्यवदने तनू हेम कांती । काखेशी कौपीन वरी धरी बालवृती ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥८॥
कंठात मौतिकमणी रुळती जयाच्या । भाळावरी टिळक केशरी ही तयाच्या ।
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥९॥
सप्रेम भाव धरुनि गुरु वंदनाचा । ऐसा धरी नियम जो सुखी हो त्रिवाचा ।
राधेय कृष्ण सुतदास दिगंबराचा । सेवेसी तत्पर उभा सुविनित साचा ॥
दिनार्ती नाशक गुरु करवीर वासी ॥ श्रीकृष्ण दत्त अवधूत नमो तयासी ॥१०॥
॥ श्री गुरुदेव दत्त ॥

## ॥ श्री दत्ताची आरती ॥

तुझे दर्शन घेता जातील निजपापे । दर्शनमात्रे विलया हरतील बहु दु:खे ।
चरणी मस्तक ठेऊनी मनी समजा पुरते । वैकुंठीचे सुख नाही या परते ॥ धृ ॥
जयदेव जयदेव जय सदगुरु दत्ता । जय नरहरी दत्ता । अगम्य लीला स्वामी ।
त्रिभुवनी तुझी सत्ता । जयदेव ॥१ ॥ सुगंध भाळी केशर वर टोपी टिळा ।
कानी कुंडल शोभती वक्षस्थळी माळा । शरणांगत तुज होता भय पडले काळा ।
तुझे भक्त करती तुझे दास करती । सेवा सोहळा ॥२ ॥ मानवरुपी
काया दिससी आम्हास । अक्कलकोटी गेला । अक्कलकोटी गेला ।
घेऊनी यतीवेश । पूर्णब्रह्म अवतरले खास अज्ञानी जीवासी ॥
विपरीत हा भास । निर्गुण निर्विकार विश्वव्यापक । स्थिरचर व्यापुनी ।
अवघा उरलासी तू एक । अघटित करणी करुनी दाविसी आम्हा एक ॥ तुझे ॥
गुण वर्णिता तुझे रूप वर्णिता हरले विधिलोक ॥४ ॥ या जन्मी निज सुकृत
गाठी । त्याची ही फलप्राप्ती । सदगुरूची भेटी सुवर्ण ताटी । भरली अमृत
रसवाटी । शरणागत भक्तावरी । शरणागत दासावरी करि कृपादृष्टी ॥५ ॥

## ॥ पद - १ ॥

चला सख्यानो करवीर क्षेत्री कुंभार गल्लीला ।
कृष्ण सरस्वती प्रभू तेथे अवतरला ॥धृ ॥
पिता अत्री माता अनसूया भूषण सकळाला ।
राजापासून रंकापर्यंत जग हा उध्दरिला ॥१ ॥ चला...
ब्रह्मा विष्णू पूर्ण महेश्वर दत्त आपण झाला ।
शंख चक्र चारही वेद होते बरोबरीला ॥
भक्तजनांचा उध्दार करुनी औदुंबरी राहिला ॥२ ॥ चला...
त्रैलोक्याचा अधिपती हा लीन कसा झाला ।
बाळपणी वेश संन्यस्थ जगता दाखविला ।
सुश्रृषणा करी धेनूची दंड हाती धरिला ॥
लक्ष्मी म्हणे ठाव चरणी देई अबलेला ॥३ ॥ चला...

## ॥ पद - २ ॥

जयजयकार करा । दत्ताचा जयजयकार करा ॥
परब्रह्म तो बहुतरुपी । प्रकटला अवतार ॥१ ॥ दत्ताचा...
सदगुरु रूपी प्रकटूनि जगी । दाविला प्रेम झरा ॥२ ॥ दत्ताचा...
दत्त अवधूता भक्त वत्सला । पायी खडा अवतार ॥३ ॥ दत्ताचा...

## ॥ अभंग ॥

तीन शिरे सहा हात । तया माझा दंडवत ॥
काखे झोळी पुढे श्वान । नित्य जान्हवीचे स्नान ॥
माथा शोभे जटाभार । अंगी विभूती सुंदर ॥
शंख चक्र गदा हाती । पायी खडावा शोभती / गर्जती ॥
तुका म्हणे दिगंबर । तया माझा नमस्कार ॥
दिगंबरा दिगंबरा ॥ श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥

**अष्टक संपताच सायंकाळची आरती सुरु होते.**

## ॥ सायंकाळची आरती ॥ (वेळ: सूर्यास्त समयी)

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा ।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा ।
नेती नेती शब्द न ये अनुमाना ।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना॥ धृ. ॥ १ ॥
॥ जयदेव जयदेव जय सद्‌गुरुद्‌त्ता । जय नरहरीदत्ता ॥
आरती ओवाळीतां हरली भवचिन्ता ॥ जयदेव जयदेव ॥ २ ॥
सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त ।
अभाग्यासी कैसी न कळे ही मात ।
पराही परतली तेथे कैचा हा हेत ।
जन्ममरणाचा पुरलासे अंत ॥ जयदेव जयदेव ॥ ३ ॥
दत्त दत्त ऐसे लागले ध्यान ।
हरपलें मन झालें उन्मन ।
मी तू पणाची झाली बोळवण ।
एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान ॥
॥ जयदेव जयदेव जय सद्‌गुरुद्‌त्ता । जय नरहरीदत्ता ॥
आरती ओवाळीतां हरली भवचिंता ॥ जयदेव जयदेव ॥ ४ ॥
दिगंबरा दिगंबरा । श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥

**रात्रौ ८.०० वा. भजन सुरु होते व ८.३० वा. धूप होऊन धूप आरती सुरु होते.**

## ॥ धूप आरती ॥ (वेळ: रात्रौ ८.३० वाजता)

त्रिगुणात्मक त्रैमूर्ती दत्त हा जाणा।
त्रिगुणी अवतार त्रैलोक्यराणा।
नेती नेती शब्द न ये अनुमाना।
सुरवर मुनिजन योगी समाधि न ये ध्याना॥ धृ. ॥१॥
॥ जयदेव जयदेव जय सद्‌गुरुद्‌त्ता । जय नरहरीदत्ता ॥
आरती ओवाळीतां हरली भवचिन्ता ॥ जयदेव जयदेव ॥ २ ॥
सबाह्य अभ्यंतरी तू एक दत्त।
अभाग्यासी कैसी न कळे ही मात।
पराही परतली तेथे कैचा हा हेत।
जन्ममरणाचा पुरलासे अन्त॥ जयदेव जयदेव ॥ ३ ॥
दत्त दत्त ऐसे लागले ध्यान।
हरपलें मन झालें उन्मन।
मी तू पणाची झाली बोळवण।
एका जनार्दनी श्रीदत्त ध्यान॥
॥ जयदेव जयदेव जय सद्‌गुरुद्‌त्ता । जय नरहरीदत्ता ॥
आरती ओवाळीतां हरली भवचिन्ता॥॥ जयदेव जयदेव ॥ ४ ॥
दिगंबरा दिगंबरा । श्रीपादवल्लभ दिगंबरा ॥

कृष्णा पंचगंगा संगम निजस्थान । चरित्र दाउनि केले गाणगापुरी गमन ॥ तेथे भक्त श्रेष्ठ त्रिविक्रम यति जाण । विश्वरूप तया दिधले दर्शन ॥ जयदेव जयदेव जयसदगुरुदत्ता जय नरहरी दत्ता ॥ नरसिंह सरस्वती कृष्ण सरस्वती जय विश्वंभरिता ॥ जयदेव ॥ १ ॥ वंध्या साठी वर्ष पुत्रनिधान । मृत ब्राह्मण उठविला तीर्थ शिंपून । वांझ महिषी काढवी दुग्ध दोहून ॥ अंत्यज्याचे वदनी निगम संपूर्ण ॥ जयदेव ॥ २ ॥ शुष्क काष्ठी पल्लव दाउनि लवलाही । कुष्ठी ब्राह्मण केला शुद्‌ध निजदेही । ऐसा महिमा तुझा वर्णू मी काई । म्लेंच्छ राजा येऊनि वंदी तव पायी ॥ जयदेव ॥ ३ ॥ दिपवाळीचे दिवशी भक्त येउनी । साधू येऊनी ॥ आठही जन मस्तक

ठेविती तव चरणी । आठही ग्रामी भिक्षा केली सद्‌गुरुनी । निमिषमात्रे तंतुक नेला शिवस्थानी ॥ जयदेव ॥ ४ ॥ ऐसे चरित्र दाउनि जडमुढ उध्दरिले । भक्त वत्सल ऐसे ब्रीद मिरविले ॥ अपार महिमा म्हणवुनि वेद श्रुति बोले ॥ गंगाधर तनया हा वंदि पाऊले ॥ जयदेव ॥ ५ ॥

सुखकर्ता दुःखहर्ता निर्मळ एकांता । कलिमल दहना गहना स्वामी समर्था ॥ न कळे ब्रह्मादिका अंत अनंता । तो तूं आम्हा सुलभ जय कृपावंता ॥ जयदेव जयदेव करुणाकरा । आरती ओवाळूं ॥ सद्‌गुरू माहेरा ॥ जयदेव ॥ १ ॥ मायेविण माहेर विश्रांती ठाव ॥ सहज अर्थ बोले सदभाव । सद्‌गुरू प्रसाद सुलभ उपाय ॥ रामी रामदास बोले सदभाव ॥ जयदेव ॥ २ ॥

दिगंबर पितांबर व्याघ्रांबर वसन । सहचारी दश बाहू दीप्त त्रिनयन ॥ मातापूर नगर एक स्मशान । वसतिस्थान भिन्न परि तो अभिन्न । जयदेव जयदेव जय दत्ता अवधूता । स्वामी अवधुता । श्रीकृष्ण भगवंता जय गौरीकांता । जयदेव ॥ १ ॥ ब्रह्मचर्यसंपन्न श्री रमणीयध्यान । हिमाद्रि तनया जाया हे चंद्रवदन ॥ पादुका पदपद्‌मी नागारीवहन । वृषभारूढ जो कां त्रिपुरदहन ॥ जयदेव जयदेव ॥२ ॥ स्तवितां भेदाभेद न दिसे तत्वतां । नकळे भेदाभेद कवण्या भाविका ॥ गुरूची सर्व ऐसे भासे पंडिता । म्हणूनी मौन चरणी ठेविला माथा ॥ जयदेव ॥

## ॥ अष्टक ॥

अनेका जन्मीचा निज सुकृत ठेवा जरी असे । भवाब्धीचे ठायी तरि तव पदांभोरूह दिसे । जनोध्दारासाठी भगवद अवतार प्रकटला । दयासिंधो आता नरहरी गुरु पाव मजला ॥ १ ॥

कुरुंदवाड ग्रामी उभय जलगा संगम वनी । महासिध्दस्थानी गहन तप केले वर मुनी ॥ जय योगाभ्यासे निज तपन भावे तपविला । दयासिंधो ॥ २ ॥

पतिताच्या तोंडे करुनी निगमाते पढविले । महिषी वांझेसे अमृत शिवहस्ते दुभविले ॥ किडलेल्या खांबाचा तरू करूनि तोहि फुलविला ॥ दयासिंधो ॥ ३ ॥

अनुष्ठानी माझे मन बसत नाही म्हणूनिया । नको दुराऊं तूं कठीण मन देवा करुनिया । न गुंतावे कोठे मम शपथ घालीन तुजला । दयासिंधो ॥ ४ ॥

अकाळी मेघाते मुख पसरिता चातक म्हणे । न देशी तूं बिंदू त्वरित मजला जाण मरणे ॥ नुपेक्षी तूं दाता गगनजल देतो निवविला ॥ दयासिंधो ॥ ५ ॥

निजानुष्ठानाचे तपफळ न माये त्रिभुवनीं । तदा झाली कैसी अवचित दया ते तव मनीं । पतीताला पाहुनी सकळाहि दुरात्माची कळला ॥ दयासिंधो ॥ ६ ॥

बहू म्या वर्णावे तरि बारे शमविले । सुरेंद्रा इंद्राला परम गुरूचा पार न कळे ॥ अनेका जिव्हीचा फणिवरहि तूं निजविला ॥ दयासिंधो ॥ ७ ॥

नृसिंहस्वामी हे पठण करितां अष्टक तुझे । तरी माझे देही भव दुरित दावानळ विझे ॥ दरिद्राची वार्ता तडफडत गेली रिपुघरा । निजानंदे डोले सुखरूप असे सेवक बरा ॥ दयासिंधो ॥७॥

धन्य धन्य हो प्रदक्षिणा सद्गुरूरायाची । झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची ॥ धृ ॥ पदोपदी अपार झाल्या पुण्याच्या राशी । सर्वही तीर्थे घडली आम्हा आदि करुनी काशी ॥ धन्य ॥ १ ॥ मृदंग टाळ घोष भक्त भावार्थे गाती । नामसंकीर्तनी नित्यानंदे नाचती ॥ धन्य ॥ २ ॥ कोटी ब्रह्महत्या हरती करितां दंडवत । लोटांगण घालीता मोक्ष लागे पायासी ॥ धन्य ॥ ३ ॥ गुरुभजनाचा महिमा न कळे अगमा निगमांसी । अनुभव जे जाणती ते गुरुपदिचे अभिलाषी ॥ धन्य ॥ ४ ॥ प्रदक्षिणा करुनी देह भावे ओवाळीला ॥ श्रीरंगात्मज विठ्ठल पुढे उभा राहिला ॥ धन्य ॥ ५ ॥

दत्तराज गुरु माझे आई । मजला ठाव द्यावा पायी ॥ १॥
गुरु महाराज गुरु । जयजय परब्रह्म सद्गुरू ॥ ५ ॥

**धूप आरती नंतर रात्रौ ९.०० वा. नैवेद्य व विडा दाखवून शेज आरती (विडा/अष्टक) सुरु होते.**

# ॥ शेज आरती ॥

## ॥ विडा - १ ॥

विडा घ्या हो श्रीगुरुराया । धरूनी मानवाची काया ।
यतीवेष घेऊनिया । वससी दिनासी ताराया ॥ विडा ॥धृ ॥
ज्ञान हे पूगिफळ । भक्ती नागवल्ली दळ ।
वैराग्य चूर्ण विमल । लवंगा सत्क्रिया सकल ॥ विडा ॥१॥
प्रेम रंगवी जैसा कात । विडा अष्टभावा सहित ।
जायफळ क्रोध रहित । पत्री सर्वभूत हित ॥ विडा ॥ २ ॥
खोबरे हेचि क्षमा । फोडूनी द्वैताच्या बदामा ।
मनोजयाचा वर्ख हेम । कापूर आहे शांति नाम ॥ विडा ॥ ३॥
कस्तुरी निर्हंकार । कोठे न मिळती उपचार ।
भीमापुत्र यास्तव फार । सत्वर विनवी वारंवार ॥ विडा ॥४ ॥

## ॥ विडा - २ ॥

आता स्वामी सुखे निद्रा करा अवधूता नरसिंह सरस्वती अवधूता ।
चिन्मय सुखधामी जाऊनी पहूडा एकांता ॥
वैराग्याचा कुंचा घेऊनि चौक झाडिला ।
तयावरी सप्रेमाचा शिडकावा केला ॥
पायघड्या घातल्या सुंदर नवविधा भक्ती ।
ज्ञानाच्या समया उजळुनी लाविल्या ज्योती ।
भावार्थाचा मंचक हृदयाकाशी टांगिला ॥
मनाची सुमने करुनि केले शेजेला ।
द्वैताचे कपाट लावुनि एकत्र केले ॥
दुर्बुध्दीच्या गाठी सोडूनि पडदे सोडिले ।
आशा तृष्णा कल्पनेचा सांडूनि गलबला ॥

दया क्षमा शांति दासी उभ्या शेजेला ।
अलक्ष उन्मनी घेउनी नाजुकसा शेला ।
निरंजनी सद्‌गुरु माझा निजे शेजेला ॥

## ॥ प्रार्थनेचे अभंग ॥

आता गुरुराया परिसावी विज्ञापना । दासांची करुणा येऊ द्यावी ॥ नेणूंनिया सोय फिरलो दिशा दाही ॥ झाले दु:ख देहि बहुसाल ॥ १ ॥ तुमची ब्रिदावळी पतीत पावन । कीर्ती ऐकून शरण आलो ॥ २ ॥ माझा मायबाप गणगोत बंधू । तूंचि दयासिंधू गुरुराया । आता काय नेणे तुमच्या पायाविणे । संसाराचे पेणे दूर करा ॥ ३ ॥ जोडूनिया कर शिर पायावरी । ठेविले निर्धारी जनार्दना ॥ ४ ॥ तुज मी अनंता काय सांगू आता । माझी सर्व चिंता असो द्यावी ॥ ५ ॥ नेणे भक्ती ज्ञान कर्मोपासना । तुज मी नारायणा ध्यात आहे ॥ ६ ॥ पतीत मी पापी दुर्गुणी आगळा । परी गोपाळा शरण आलो ॥ ७ ॥ पतित तारिले पशु उध्दरीले । पक्षी तेहि नेले मोक्षा लागी । सिध्देश्वर म्हणे ऐसी ख्याती । मजबा श्रीपती तारी आता ॥ ८ ॥ स्वामी नरसिंह सरस्वति । मनी धरुनिया प्रीती ॥ ओवाळीतो शेजारती ॥ अंगिकरा या श्रीपति ॥ स्वा. न. ॥ ब्रह्मा देव येऊनिया । म्हणे कवण्या कवण्या जीवा । उपजवूं कोठे केव्हां ॥ संदेश हा मज व्हावा ॥ स्वा. न. ॥ विष्णू देव येऊनिया । आज्ञा मागे वंदुनिया ॥ कवण्या जीवा काय खाया । कैसे देऊ कवण्या ठाया ॥ स्वा. न. ॥ येवूनिया महादेव । वंदोनिया पायद्वय ॥ ज्ञान देऊ कवण्या जीवा ॥ आज्ञा करा स्वयं देवा ॥ स्वा. न. ॥ अंबा म्हणे बाळा यती ॥ फार झाले असे रात्री ॥ झोप लागो तुम्हाप्रति । भक्त रक्षण्या श्रम होती ॥ स्वा. न. ॥ विनविता भक्तवृंद । सेवा घेवुनिया छंद ॥ पूर्ण देई ब्रह्मानंद । भीमापुत्र आनंदकंद ॥ स्वा. न. ॥

आता स्वामी सुखे निद्रा करा गोपाळा । देवा दत्ता दयाळा ॥ पुरले मनोरथ जातो आपुल्या स्थळा । आता स्वामी.... ॥ १ ॥ पावला प्रसाद आता सुखे निजावे । आपल्याला श्रम होती बहुत स्वभावे । आता स्वामी ...॥ २ ॥ तुम्हांस जागविले स्वामी आपुल्या काजा । शुभाशुभ कर्मदोष हरावया माझा । आता स्वामी... ॥ ३ ॥ तुका म्हणे उच्छीष्टाचे दिधले भोजन । नाही निवडिले आम्हा आपल्या भिन्न ॥ आता स्वामी..॥

## ॥ भजन ॥

श्री गुरु देवा जय गुरुदेवा । करुणा मूर्ती हरि गुरुदेवा ॥

## ॥ शयनाष्ट्क ॥

सखया निजबा रे गुरुराया यतिराया श्रीकृष्णा सखया निजबा रे ॥ धृ ॥ मिरवी मंचक हा हेममयी मुक्ताफल मणीमयी । वस्त्र विचित्र जरतारी शेजेवरी अंथरली ॥ १ ॥ बकुल, चमेली, मालती, जाई, जुई, शेवंती । कमल कल्हार, आनंती, सुमने शेजेवरती ॥ २ ॥ यमन, बिहाग, केदार, आलाप, सुस्वर । यक्ष, गंधर्व, किन्नर, गाती जोडोनि कर ॥ ३ ॥ रंभा उर्वशी मेनका सुरंगना आणिका । करिती मंजुळ नृत्यदिका रमवाया प्राणसखा ॥ ४ ॥ चंदन चर्चियले अंगाला केशरी मळवट भाळा । तिलक कस्तुरी रेखीला मोद न माय मनाला ॥ ५ ॥ छत्री चामरे ढाळिती अष्टसिध्दी तिष्ठती । मंजुळ मधुर स्वरे विनविती श्रमले ते श्रीपती ॥ ६ ॥ घीवर, जिलेबी, बासुंदी, पेढे, पुऱ्या, बुंदी । दूध शर्करा त्यामध्ये स्वीकारावे आधी ॥ ७ ॥ गुणत्रयोदश तांबुल सेवी त्रिभुवनपाल । घेई विश्रांती वेल्हाळा ॥ नाथा दीन दयाळा ॥ ८ ॥

## ॥ अपराध क्षमा स्तोत्र ॥

अपराध क्षमा आता केला पाहिजे । गुरु हा केला पाहिजे ।
अबध्द सुबध्द गुण वर्णियले तुझे ॥ धृ ॥
ताल नाही सूर नाही कंठ सुस्वर । गुरु हा कंठ सुस्वर ।
झाला नाही बरा वाचे वर्ण उच्चार ॥ १ ॥
अपराध क्षमा आता केला पाहिजे । गुरु हा केला पाहिजे ।
अबध्द सुबध्द गुण वर्णियले तुझे ॥ धृ ॥
न कळेची टाळ वीणा वाजला कैसा । गुरु हा वाजला कैसा ।
अस्ताव्यस्त पडे नाद गेला भलतैसा ॥२ ॥
अपराध क्षमा आता केला पाहिजे । गुरु हा केला पाहिजे ।
अबध्द सुबध्द गुण वर्णियले तुझे ॥ धृ ॥
निरंजन म्हणे तुझे वेडे वाकुडे । गुरु हे वेडे वाकुडे ।
गुण दोष न लावावा सेवकाकडे ॥ ३ ॥
अपराध क्षमा आता केला पाहिजे । गुरु हा केला पाहिजे ।
अबध्द सुबध्द गुण वर्णियले तुझे ॥ धृ ॥

**शेजारती संपल्यानंतर रात्रौ ९.३० वा. समाधीवरील पूजा उतरविली जाते व रात्रौ १०.०० वा. श्रींना शेजघरात झोपविले जाते.**

**अशाप्रकारे सर्व दिवसाचा कार्यक्रम पूर्ण होतो.**

## ॥ श्री कृष्णसरस्वती दत्त महाराजांच्या जन्मकाळाचा पाळणा ॥

जो जो जो जो रे । यतीराया । कृष्णसरस्वती सद्या ॥
बाळा जो जो रे ॥ धृ ॥
नांदणी ग्रामीचा । द्विज जाती । अप्पानामे ख्याती ।
भार्या तयाची । रूपवती । देवी समान जगती ।
बाळा ॥ १ ॥
सद्गुण युत पूर्ण । कुलयुवती । अन्नपूर्णा ख्याती ॥
अप्पा द्विजासी । होत आता । संसारी सुख शांती । बाळा ॥ २ ॥
ऐशा रितीने । दंपती । प्रेमभरे नांदती ।
अप्पा द्विजासी सुख शांती । होत तया उपरती ।
बाळा ॥ ३ ॥
वाडी ग्रामाते । जाउनी । सेवा करि निर्वाणी ।
बरवे आशिर्वचने । लाधोनी । परत येई निजधामी ।
बाळा ॥ ४ ॥
येवूनी दृष्टांती । गुरुराणा । देई अभय वचना ।
तव गृही अवतारू । ब्राह्मणा । शंका न धरी सुजना ।
बाळा ॥ ५ ॥
राहे जव माता । गरोदर । डोहाळे होती फार ।
स्वामी आनंदे । निर्भर । राहती साचार ।
बाळा ॥ ६ ॥
मासोत्तममास । माघ बरा । पंचमी दीन अवधारा ।
प्रात: समयी तूं गुरुवरा । अवतरसी दातारा ॥
बाळा ॥ ७ ॥
हर्षे कोंदले । अंबरी करिती जयजयकार ।
यक्ष गंधर्व । किन्नर । वर्षती सुमन संभार ॥
बाळा जो जो रे ॥ ८ ॥



**जन्म - माघ वद्‌य पंचमी शके १७५७ रविवार दिनांक ७ फेब्रुवारी १८३६**
**इ. वेळ: सूर्योदयाबरोबर ७ वा. ०७ मि.**

**समाधी - श्रावण वद्‌य दशमी शके १८२२ सोमवार दिनांक २० ऑगस्ट १९००**